श्री

१११ वॉल्ड्रन स्ट्रीट। वेस्ट लाफायेट। इंडियाना ४७९०६। यू एस् ए॥

बॉस्टन बर्कली पुणे इंदूर औरंगाबाद हैदराबाद येथील अभ्यंकर परिवार व सर्व मित्रमंडळीस यथायोग्य नमस्कार आशिर्वाद॥

शिवमहिम्नाचे हे मराठी समश्लोकी भाषांतर मी ११ ते १९ ऑगस्ट १९९६ या दिवसांत केले॥ ते आज म्हणजे २४ ऑगस्ट १९९६ रोजी छापून तुमचेकडे पाठवीत आहे॥ मूळाप्रमाणे यातील १ ते २९ श्लोक शिखरिणीत। ३० वा श्लोक हरिणीत। ३१ ते ३४ व ३७ ते ३८ श्लोक मालिनीत। ३५ ते ३६ व ३९ ते ४२ श्लोक अनुष्टुभात। आणि ४३ वा श्लोक वसंततिलकेत असे योजिले आहेत्॥ हे तुम्हाला आवडोत॥

भाषांतरकर्ता: अभ्यंकरकुलोत्पन्न शंकरसुत श्रीरामशर्मा॥

## शिवमहिम्नाचे मराठी समश्लोकी भाषांतर

मला वाटे आहे सुरस महिमा तेजमय हो।
स्तुती केली मोठी जरि तरि जिची मानव अहो॥
तयाची देवांनी कितिहि भजनालागि जरि हो।
तशी आहे माझी बहुत रचना मादक अहो॥ १॥

मना बुध्दीच्याही बहुपलिकडे तत्व दिसते।
सुरांनी वेदांनी म्हणुनि जरि ते नेति असते॥
असे तेथे जाणे वदनि वदणे शक्य नसते।
म्हणोनी आम्ही हे इथुनि करितो वंदन तुते॥ २॥

सुरेखा वाणीचे करुनि तव उत्पादन असे।
तुझ्यासाठी केले स्तवन गुरुने सुंदर कसे॥
म्हणालो आहे मी शिवशिव महादेव नमसे।
तयाचे रूपासी लवकर करोनी मग जसे॥ ३॥

तुझ्या सामर्थ्याने जननमरणाचेहि घडणे।
रजोसत्त्वाचेही तमसहचि सर्वासम जिणे॥
असे आहे ठावे जरि तरि नसे तेचि वदणे।
म्हणोनी मूढांचे वदन धरणे कोण करणे॥ ४॥

कशी केली तुम्ही जगत गुण यांची घड जशी।
जरी नाही आम्हा दिसत तुमची आकृति अशी॥
तरी वाटे मोठे कुतुहल असे जव मशी।
म्हणोनी मूढांचे हृदय फुटते विस्मित कशी॥ ५॥

जगाचे जे उत्पादन तुजसि लीलामय असे।
नसे ठावे मूढा म्हणुनि करिती संशय जसे॥
दिसे त्यांना नाही करकमल त्याचे तरि कसे।
म्हणोनी वाटे हे भवभय असे जे सम नसे॥ ६॥

यजुर्वेदासामा ऋगशिवमते विष्णु म्हणणे।
मुनींचे योगाचे मत जरि असे सांख्य वदणे॥
कितीही मार्गांनी गमन करणे प्राप्त असणे।
तुझेची रूपाला मिळुनि भजणे तेचि दिसणे॥ ७॥

नरांच्या डोक्यांचे परशुरजिने हार रुळती।
तसे तोंडातोंडी रघुरघु असे नाम जपती॥
तुझेची ध्यानाने सकल धन ते प्राप्त म्हणती।
तसेची मुक्तीची करुनि बरवी सोयहि किती॥ ८॥

सदा आहे नाही जगत दिसते ते तरि कसे।
दिसावे नाही जे परि असतसे सादृश जसे॥
नमावे बोलावे जरितरि तुझे नामहि तसे।
म्हणोनी आलो मी शरण शिव जो त्या तव असे॥ ९॥

तुझे ते मोजावे चतुरवदना ज्यास म्हणवे।
तयाचे बाजूला स्थित नरहरी त्यासहि हवे॥
तरी त्यांना नाही उमगत तुझे रूप हरवे॥
परी त्यांचे केले समजुनि समाधान बरवे॥ १०॥

तिघाही लोकांची भुवन वसने ती जरि अशी।
तुझी जी मोठी ती कुटि तुजसि हो त्यापर जशी॥
दहाही डोकी ती सरळ निघुनी त्यावर कशी।
तुटोनी गेली ती तव चरण त्यांचे वर जशी॥ ११॥

उमादेवो बैसे धवल अग तो जो हिममुखा।
फुगोनी गर्वाने दशदशभुजांनी वर सुखा॥
पदाचे भाराने मग झुकविले त्या दशमुखा।
तधी त्याने मोठी स्तुतिहि रचिली सुंदर सखा॥ १२॥

शरादैत्याने जे भजन तव केले सुरवरे।
तयाने झालासी अतिमुदित तू शंकर हरे॥
म्हणोनी केलेसी पुलकित तयाला मग खरे।
तशी ऋध्दी झाली मग शिर करोनी नत बरे॥ १३॥

सुरादैत्ये केले मिळुनि सगरा मंथन अहो।
तयातोनी आले भयजनित हालाहलचि हो॥
तयाने हो केले तववदन नीलामय अहो।
तसेची हे झाले भयरहित सर्वास जग हो॥ १४॥

त्रिनेत्री जाळोनी तनुरहित केलेसि मदना।
तधी त्याने बाणे शिवशिव महादेव सदना॥
परन्तू उःशापे उठवुनि तया जो गुरुमना।
तयाने तेव्हां जे स्तवन रचिले ते मधुवना॥ १५॥

प्रमोदे नाचावे डमडमत गाजे मग तरी।
जगाला पोषावे म्हणुनि करितो तांडव जरी॥
भयाने जेव्हां ही धरणि तव पादे धडकरी।
त्रिमात्रा साधोनी मग अभय देतो वर करी॥ १६॥

नदी जी आकाशी लुकलुक करोनी झळकते।
उडी जी मारोनी तव शिर तयाते अडकते॥
तुला वंदोनी ती धरणितल आच्छादि मग ते।
म्हणोनी लोकांना पुनित करिते जी बहुमते॥ १७॥

तिहीस्थाने तोडी असुरवसने ती जरि वरी।
तयासाठी केली रथधरणि बाणा मग हरी॥
शशी जो त्यालाही रविसहित चक्रासम धरी।
अशी क्रीडा केली म्हणुनि तुज मी वंदन करी॥ १८॥

तुझे जेव्हां केले स्तवन हरिने ते बहु मुदे।
तयावेळी त्याने तुजसि भजिले जे तव पदे॥
सहस्राने केली तव कमल पूजा जरि मदे।
तयावेळी चक्रा सकल जगरक्षा म्हणुनि दे॥ १९॥

घृताने अग्नीला वश करुनि यज्ञासि करि जो।
तया देतो जैसे फल म्हणुनि संपत्ति धन जो॥
तसेची शक्तीही सुखसहित देतो बहुत जो।
म्हणोनी वेदांना परिमित जरी मानव भजो॥ २०॥

सतीच्या बापाने मख करविला जो दृढतरे।
सतीचा तू भर्ता तुजसि अपमाना करुनि रे॥
तया केली शिक्षा म्हणुनि मग तू मोक्षद हरे।
तरीही त्या दक्षा पुनरपि करी जीवित बरे॥ २१॥

प्रजानाथे जेव्हां मृगसम शरीरासि धरिले।
मुलीच्या हव्यासे करुनि मग तो त्यास वरिले॥
तुझे जे व्याधाचे अतिरम असे रूप धरिले॥
तया बाणे केले त्वरित मग ते निष्फळ भले॥ २२॥

जगाची माता जी तिजसह तुला बध्दहि करी।
तयाच्या बाणेही मदन रतिचा तो पति जरी॥
तयाला जाळोनी पुनरपि कसे जीवित करी।
म्हणोनी देवाला शिवहर असा जो अनुसरी॥ २३॥

स्मशानाचे क्रीडास्थळ करुनि जो शाश्वत असे।
तयाच्या सांनिध्या सहचर असे भूतहि जसे॥
कपाळी ज्याच्या हे वरिवरि कसे भस्म गवसे।
तयाला माझे हे शरणपदजे मी जपतसे॥ २४॥

मनाच्या भावाला मुनिजन समाधिस्थचि करी।
जयाच्या ध्यानाने पुलकित तनू त्यागुनि जरी॥
उमादेवी ज्यांची प्रियवदन जी ती बघ खरी।
तया देवा माझे नमन करिजे मी झडकरी॥ २५॥

असे वायू पृथ्वी नभसहित जी ती खग जसे।
तुझी देवा रूपे सृजन करि लीला तव दिसे॥
तुझे नाही जेथे लवभर असे स्थानहि नसे।
तुझी नावे देवा स्मरण करि मी सुंदर असे॥ २६॥

तिघांची रूपेती शिव चतुरजी विष्णु सह ती।
स्वराघाते तीन्ही मग तुरिय ओंकार म्हणती॥
तशीही वेदांची त्रिकुटरचना सुंदर अती।
अशीही देवाची विविध रचना विस्मित मती॥ २७॥

महादेवा रुद्रा भव पशुपती तूच असशी।
जगाची उत्पत्ती भयसहित शर्वा तुज जशी॥
यजुर्वेदालाही थकवि जरि ती शाश्वत अशी।
म्हणोनी आनंदे तुज नमन मी जे कशिबशी॥ २८॥

नमो देवा देवा जवळ जरि तू दूरचि महा।
नमो देवा देवा लघुगुरुहि ऐसा शिव महा॥
नमो देवा देवा तरुण जरि तू वृध्दचि महा।
तुला माझे वंदे शरण तरि मी तू शिव महा॥ २९॥

जगत जनकाला वंदू त्यास तो रजयुक्त जो।
मरण जगताचे तो वंदू तया तमयुक्त जो॥
सकल सुखधामा वंदू त्यास तो गुणसत्त्व जो।
शिवशिव महादेवा वंदू तया हर त्यासि जो॥ ३०॥

बहुलघुतम आहे मी मला हो जपावे।
तरि तुज शिव देवा मी कसे आळवावे॥
म्हणुनि मजसि आता ज्ञान विद्या मिळावे।
परि मज शिशु त्याला ते कसे आकळावे॥ ३१॥

जरि गिरिभर शाई घातली हो नदीला।
तरुवर मग जो हा लेखनी तो जहाला॥
जरि मग बस देवी शारदा ती महाला।
तरि भरपुर पूजा नाहि होणे शिवाला॥ ३२॥

असुरसुरमुनींनी पूजनाला तयाच्या।
शिरवरि शिवदेवा चंद्र आहे जयाच्या॥
जरिबहुतरि केले काव्य माझे तयाच्या।
यमनसभगणाये तो लघूच्या गुरूच्या॥ ३३॥

परम चरण तूझे जे मिळाले तयाने।
प्रतिदिनि जरि माझे काव्य गावे जगाने॥
सुमकुसुम जरी हो दात माझे तयाने।
मग तव सुखधामी जे असावे जगाने॥ ३४॥

महेश देव जे मोठे त्यांचे पायी नमो भवे।
महिम्न स्तोत्र जे मोठे त्याचा मी हो करी स्तवे॥ ३५॥

दीक्षा दान तपाने जे विज्ञान तव आकळे।
महिम्न पाठ जो कीजे तरी मुक्ती तया मिळे॥ ३६॥

कुसुमदशन ज्याचे नाव जो तो शिवाचा।
अतिशय जरि रागे त्यास झाला मनाचा॥
तरिमग तव स्तोत्रे त्यामुळे तो भवाचा।
तरुनि स्तवुनि गेला शंकराचा जिवाचा॥ ३७॥

सुरवरमुनि ज्याला वंदिती हो शिवाला।
तव शरणरजाला मानिती शंकराला॥
स्तवन जरि महिम्ने त्यासि जो हे म्हणाला।
तरमग तवपादी नेइजे हो तयाला॥ ३८॥

समाप्त होवुनी गेले पुष्पदंते रचोनिया।
महान स्तोत्र जे झाले त्यास वंदे करोनिया॥ ३९॥

संपे काव्यमयी पूजा शंकरा चरणावरी।
त्यासवे वाजवी बाजा आवडो तुज त्यापरी॥ ४०॥

तवतत्व नसे ठावे तव महिम्न ते बरे।
तव स्तोत्र जने गावे मम तुला नमो खरे॥ ४१॥

एकवेळा बहूवेळा म्हणे स्तोत्र असे खरे।
तरि अंती बहू खेळा शिवाच्या जवळे बरे॥ ४२॥

श्री पुष्पदंतमुख त्यातुनि स्फूर्त झाले।
स्तोत्रास आवडुनि मानव धन्य केले॥
कंठात धारण करोनि फळास आले।
सुप्रीय होवुनि शिवास उमेस धाले॥ ४३॥

## उपसंहार

शंकरा उमेचा सुत श्रीराम नामे करित।
हा समश्लोकी भाषांत महिम्नाचा मराठित॥ १॥

१९ ऑगस्ट १९९६ इसवी सनी
नागपंचमीचे सुमुहुर्ती समाप्त